# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI.

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director Students' Development (I/c.)**
**Ph. No. -**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org
**Email :** nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW / 1378 /2019** **Dt: 23 /12/2019**

प्रति,
मा. प्राचार्य,
संलग्नीत महाविद्यालय, गडचिरोली जिल्हा
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सहभाग घेण्याबाबत.

संदर्भ :– जा.क्र.जिक्रिअ/जियुमआ/२०१९–२०/६४१ दिनांक १९/१२/२०१९

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, ग्रामीण भागातील युवक युवतीच्या सुप्त कला गुणांना वाव देवून त्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचे वतीने दिनांक २४ व २५ डिसेंबर २०१९ रोजी जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. करीता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यास कळवावे, ही विनंती.

धन्यवाद!

**संलग्नः– नियमावली व विहीत नमुना अर्ज**

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

प्रति,

मा. जिल्हा क्रीडा अधिकारी,

गडचिरोली.

विषय :- जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन सन २०१९-२०२०
सहभाग नोंदविण्याबाबत.

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती की, आपल्या कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन गडचिरोली येथे दि. २४ ते २५ डिसेंबर, २०१९ या कालावधीत आयोजित होत असल्याबाबत कळविण्यात आले आहे.

तरी सदर युवा महोत्सवाला आम्हाला प्रवेश द्यावा, ही विनंती.

## सांघीक कला बाबींकरीता विहीत नमुना

कला बाब/स्पर्धा बाबीचे नांव :- ----------------------------

| अ.क्र. | स्पर्धकाचे पुर्ण नाव | जन्मतारीख | वय | संस्था/शाळेचे पुर्ण नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

## वैयक्तिक कला बाबींकरीता विहीत नमुना

कला बाब/स्पर्धा बाबीचे नांव :- ---------------------------

| अ. क्र. | स्पर्धकाचे पुर्ण नाव | जन्मतारीख | वय | स्पर्धकाची स्वाक्षरी | संस्था/शाळेचे पुर्ण नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |

स्थळ :-

अर्जदाराची स्वाक्षरी (रबरी शिक्यासह)

दिनांक :-

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य

दुरध्वनी क्रमाक :- २२२३९७

जा.क्र.जिक्रीअ/जियुमआ/२०१९-२०/६४१
कार्यालय जिल्हा क्रीडा अधिकारी, गडचिरोली.
दिनांक :- १९/१२/२०१९

प्रति,

मा. डॉ. प्रिया गेडाम,
संचालीका विद्यार्थी कल्याण विभाग,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

विषय :- जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन सन २०१९-२०
दिनांक २४ ते २५ डिसेंबर, २०१९

संदर्भ :- मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र
क्र.युकयो/राष्ट्रीययुवामहो/१९-२०/का-१०/ दि. १३/१२/२०१९

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत आनंद होत आहे की, ग्रामीण व शहरी भागातील युवक युवतीच्या मुप्त कला गुणांना वाव देवून त्यांचा प्रतिभेला व्यासपिठ व लौकीक देण्याच्या दृष्टीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीयस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्याचे शासनाने निर्देशित केले आहे. त्यानुषंगाने जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, गडचिरोली यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन दि. २४ ते २५ डिसेंबर, २०१९ या कालावधीत क्रीडा व सांस्कृतिक भवन, कॉम्प्लेक्स, गडचिरोली येथे स. ११.०० वाजेपासून प्रारंभ होणार आहे. या महोत्सवात सहभागी होणारे युवक - युवती हे गडचिरोली जिल्हयातील रहिवासी असणे अनिवार्य असून १५ ते ३५ वयोगटातील असणे बंधनकारक राहील. तरी सदर युवा महोत्सवाची आपल्या स्तरावरून वर्तमान पत्रे व परिपत्रकाव्दारे विस्तृत प्रसिध्दी देऊन जास्तित जास्त कलाकार सहभागी होतील या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच कलाकारांची यादी जन्मतारीख व पत्त्यासह या पत्रासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात परिपुर्ण भरून उलट टपाली या कार्यालयास दि. २४ डिसेंबर, २०१९ सकाळी ११ वाजेपुर्वी पोहोचतील या बेताने पाठवावी. ही विनंती.

**जिल्हास्तर युवा महोत्सवाचे कला बाब / स्पर्धा प्रकार खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कला बाब | स्पर्धक संख्या | वेळ | | अ.क्र. | कला बाब | स्पर्धक संख्या | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लोकनृत्य | २० | १५ मी. | | १० | मृदुंग | ०१ | १० मी. |
| २. | लोकगित | ०६ | ०७ मी. | | ११ | हार्मोनियम (लाईट) | ०१ | १० मी. |
| ३. | एकांकीका स्पर्धा (इंग्रजी/हिंदी ) | १२ | ४५ मी. | | १२ | गिटार | ०१ | १० मी. |
| ४. | शास्त्रिय गायन (हिंदुस्थानी) | ०१ | १५ मी. | | १३ | मणिपूरी नृत्य | ०१ | १५ मी. |
| ५. | शास्त्रिय नृत्य | ०१ | १५ मी. | | १४ | ओडिसी नृत्य | ०१ | १५ मी. |
| ६ | सितार | ०१ | १५ मी. | | १५ | भरतनाट्यम | ०१ | १५ मी. |
| ७ | बासरी | ०१ | १५ मी. | | १६ | कथ्थक | ०१ | १५ मी. |
| ८ | तबला | ०१ | १० मी. | | १७ | कुचिपूडी नृत्य | ०१ | १५ मी. |
| ९ | वीणा | ०१ | १५ मी. | | १८ | वक्तृत्व (इंग्रजी/हिंदी) | ०१ | ०४ मी. |
| | एकुण स्पर्धक | ५३ | | | | | | |

--// महत्वाच्या अटी खालीलप्रमाणे //--

१५३. लोकनृत्य अथवा इतर गायनाच्या स्पर्धेसाठी ऑडीयो टेप ग्राहय धरण्यात येणार नाही. पार्श्वगायक असणा-या संघास प्राधान्य देण्यात येईल.

पेज नं. २ वर

१५४. प्रतीस्पर्धी कलाकाराबाबत काही आक्षेप असल्यास योग्य पूराव्यासह रु. ५००/- भरून त्याच ठिकाणी आक्षेप सिध्द करावा लागेल. सर्व स्पर्धकांना परिक्षकांचा निर्णय अंतिम मांनावा लागेल. परिक्षकाबाबत कुठलाही आक्षेप घेता येणार नाही.

१५५. कलाकारांना वयाचा प्रमाणित दाखला व रहिवासी पुरावा देणे बंधनकारक राहील..

१५६. सहभागी होणा-या कलाकाराना सादरीकरणासाठी लागणारे साहित्य स्वतः आणावे लागेल.

१५७. युवा महोत्सवातील संख्या ही साथ-संगत देणा-या सह असल्यामूळे वेगळी साथ-संगत घेता येणार नाही.

१५८. महोत्सवात सहभागी होणा-या स्पर्धकांना किंवा त्याच्या साथ संगतदाराना कोणत्याही प्रकारचा दैनीक भत्ता /प्रवास भत्ता देण्यात येणार नाही.

१५९. सर्व स्पर्धकाकडून शिस्तीचे पालन अपेक्षित आहे. बेशिस्त वर्तन आढळल्यास आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

१६०. सदर परिपत्रकातील कलाबाबीं, संख्या, वेळ यामध्ये बदल झाल्यास तो बदल आपणास ग्राहय धरणे बंधनकारक राहील.

**टिप :- स्पर्धेत सहभागी होण्याकरीता प्रवेश अर्जाचा विहीत नमुना सोबत जोडला आहे.**

**जि.क्री.अ. दौ-यावर**

आपला विश्वासु
१३/१२/१७
जिल्हा क्रीडा अधिकारी,
गडचिरोली करीता

<u>प्रतिलिपी :- माहितीस्तव सविनय सादर.</u>

१) मा. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे - १
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद, गडचिरोली.
३) मा. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, नागपूर विभाग, नागपूर.
४) मा. शिक्षणाधिकारी (माध्य/प्राथ), जि.प. गडचिरोली.